इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**[(१९५१) एस.सी.आर. १२७]**

**जॉयलाल आगरवाल - विरुद्ध - राज्य**

**युनिअन ऑफ इंडिया - हस्तक्षेपकर्ता**

**बिचानचंद मेहता - विरुद्ध - राज्य**

--------------------

**[मुख्य न्यायमूर्ति हिरालाल कानिया, न्यायमूर्ति पतंजली शास्त्री, न्यायमूर्ति मुखर्जी, न्यायमूर्ति दास आणि न्यायमूर्ति चंद्रसेखर अय्यर]**

***अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियम (१९४६ चा २४) कलम १ (३), ७ - "वगळलेल्या क्षेत्रांना" प्रयोज्यता - गव्हर्नर जनरलने ब्रिटिश भारतात आणि संविधान सभेने भारतीय स्वातंत्र्य अधिनियम १९४७ नंतर अधिनियमाचा कालावधी वाढवला - वगळलेल्या क्षेत्रांमध्ये कायदा अंमलात आहे का ? - नव्या अधिसूचनेची आवश्यकता - विधिमंडळ अधिकारांची प्रत्ययोजन - गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९३५ - कलम ९२ (१).***

अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियम (१९४६ चा २४) १९ नोव्हेंबर १९४६ रोजी *अंमलात* आला. १४ डिसेंबर १९४६ रोजीच्या अधिसूचनेनुसार, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९३५ च्या कलम ९२ (१) खाली बंगालच्या राज्यपालांनी निर्देश जारी केले की सदर अधिनियम दार्जिलिंग जिल्हा जो 'वगळलेला भाग' होता त्याला लागू होईल. अत्यावश्यक पूरवठा अधिनियमाच्या कलम १ (३) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की भारत (केंद्र सरकार आणि विधानमंडळ) अधिनियम १९४६ च्या कलम ४ मध्ये नमूद केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर त्याचा परिणाम राहणार नाही. गव्हर्नर जनरल यांनी कलम ४ अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचनेप्रमाणे अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाची अंमलबजावणी ३१ मार्च १९४८ पर्यंत वाढविण्यात आली. भारतीय स्वातंत्र्य अधिनियम १९४७ पारित झाल्यानंतर संविधान सभा ज्यामध्ये विधानमंडळाचे अधिकार १९४६ च्या इंडिया ऍक्ट च्या कलम ४ मध्ये निहित केले होते त्याद्वारे संविधान सभेने अत्यावश्यक पुरवठा अधिनियमांतर्गत व्यवहाराना ३१ मार्च १९५० पर्यंत अनुवर्धीत करण्याकरिता ठराव मंजूर

केला. दार्जिलिंगमध्ये १४ ऑक्टोबर १९४९ रोजी केलेल्या कृत्याबाबत अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत ज्या अपिलार्थी विरुद्ध अपराध सिद्ध झाले त्याने असा युक्तिवाद केला की सदर अधिनियम दार्जिलिंग जिल्ह्यापर्यंत वैधपणे अनुवर्धीत करण्यात आला नव्हता आणि त्यामुळे कथित गुन्ह्याच्या तारखेला तो तेथे अंमलात नव्हता. असे मानन्यात आले की, राज्यपालांच्या अधिसूचनेद्वारे दार्जिलिंग जिल्ह्यात सदर अधिनियम अणुवर्धीत करताना कोणताही विशिष्ट कालावधी निर्दिष्ट न केल्यामुळे, हा कायदा जो पर्यंत उर्वरित भारतात अंमलात राहील तोपर्यंत त्या जिल्ह्यात अंमलात असेल आणि राज्यपालांना गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९३५ च्या कलम ९२ (१) आधीन राहून नवीन सूचना काढणे आवश्यक नाही. भारतीय स्वातंत्र्य अधिनियमाच्या कलम ९ आणि १९ खाली केलेल्या अनुकूलनांतर्गत संसदेच्या सभागृहांना दिलेले अधिकार संविधान सभेत निहित झाले आणि अधिनियमाच्या कथित उल्लंघनाच्या तारखेला दार्जिलिंग जिल्ह्यात हा कायदा अंमलात होता .

पुढे असे मानण्यात आले आहे की, या प्रकरणात वैधानिक अधिकार सोपवण्याचा प्रश्नच उध्दभवत नाही, कारण विधिमंडळाने स्वतःच आपल्या बुद्धीचा वापर करून यंत्रणेला विशिष्ट पद्धतीनेकार्य करण्यासाठी जास्तीत जास्त कालावधी गाठण्यास सोडून अधिनियमाचा कालावधी निश्चित केला होता.

**फौजदारी अपिलीय अधिकारिता - फौजदारी अपील क्रमांक ७/१९५० आणि क्रमांक २५/१९५०.**

**फौजदारी अपील क्रमांक ७/१९५० हे कलम १३४ (१) (सी) अंतर्गत २३ मे १९५० रोजी कलकत्ता उच्च न्यायालयाच्या गव्हर्नमेंट अपील क्रमांक २/१९५० मधील न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध आणि फौजदारी अपील क्रमांक २५/१९५१ हि अपील त्याच न्यायालयाच्या फौजदारी पुनरिक्षण क्रमांक १३२/१९५० मधील ४ मे १९५० रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशातून विशेष अनुमतीने दाखल करण्यात आलेले अपील आहे.**

**दोन्ही अपिलांमध्ये अपीलकर्त्यांसाठी अजित कुमार दत्ता आणि एस. एन. मुखर्जी**

**दोन्ही अपीलांमध्ये उत्तरवादींसाठी बी. सेन.**

**हस्तक्षेपकर्त्यासाठी जी. एन. जोशी.**

**४ ऑक्टोबर १९५१. न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ति चंद्रसेखर अय्यर यांच्या द्वारे पारित..**

या दोन्ही फौजदारी अपील उच्च न्यायालय कलकत्ता यांनी अपीलकर्त्यांना दिलेल्या शिक्षादेशाच्या विरुद्ध आहेत. पहिल्या प्रकरणात, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १३४ (१) (सी) अंतर्गत उच्च न्यायालयाने या न्यायालयात अपील करण्याच्या अनुमती दिली होती . दुसऱ्या प्रकरणात, या न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद १३६ (१) अंतर्गत अपील करण्यासाठी विशेष अनुमती दिली होती. अपीलांची सुनावणी एकत्र झाली होती, परंतु सदर अपील या वेगवेगळ्या पक्षांकडून असल्याने आणि त्यातील तथ्ये वेगळी असल्याने, दोन स्वतंत्र निर्णय घेणे इष्ट आहे.

***फौजदारी अपील क्रमांक ७/१९५०***

अपीलकर्ता जॉयलाल आगरवाला, जो पश्चिम बंगाल राज्यातील दार्जिलिंग जिल्ह्यातील पुलबाजार येथील किरकोळ दुकानात विक्रेता होता, त्याच्यावर नियंत्रित किंमती पेक्षा जास्त किंमतीला कापड विकल्याचा आरोप होता. १९४८ च्या कॉटन टेक्सटाईल कंट्रोल ऑर्डरच्या खंड २४ (१) च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल, त्याला दार्जिलिंगच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी १९४६ च्या अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियमाच्या (अधिनियम क्रमांक २४) कलम ७ अंतर्गत दोषी ठरवून सहा महिन्यांच्या कठोर कारावासाची शिक्षा सुनावली. सत्र न्यायाधीशांकडे अपील केल्यावर, अपीलकर्त्याची दोन कारणांमुळे निर्दोष मुक्तता करण्यात आली. (१) कापूस वस्त्रोद्योग नियंत्रण आदेशाच्या खंड ३६ अंतर्गत खटला चालवण्यासाठी कोणतीही पूर्व मंजुरी घेण्यात आली नव्हती आणि (२) घटनेच्या तारखेला दार्जिलिंग जिल्ह्यात अत्यावश्यक पुरवठा अधिनियम अंमलात नव्हता. पश्चिम बंगाल राज्याने उच्च न्यायालयात अपील केल्यावर, नियंत्रण आदेशाच्या खंड ३६ अंतर्गत मंजुरी नसल्याचा मुद्दा प्रस्तुत अपीलकर्त्याने सोडून दिला कारण त्याची आवश्यकता केंद्र सरकारच्या नंतरच्या अधिसूचनेद्वारे रद्द करण्यात आली होती. दुसऱ्या

मुद्द्यावर, उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीशांनी असे मत मांडले आहे की सदर कायदा वैधपणे दार्जिलिंग जिल्ह्यापर्यंत विस्तारित करण्यात आला होता आणि घटनेच्या तारखेला म्हणजे दिनांक १४/१०/१९४९ रोजी त्या भागात अंमलात होता. अपीलकर्त्याची निर्दोष मुक्तता रद्द करण्यात आली, दंडाधिकाऱ्यांनी दिलेला अपराधसिद्धीचा आदेश पुनर्संचयित करण्यात आला आणि अपीलकर्त्याला चार महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

कथित गुन्ह्याच्या वेळी १९४६ चा अत्यावश्यक पुरवठा अधिनियम अंमलात होता की नाही याबाबतचा मुख्य कायदेशीर युक्तिवाद समजून घेण्यासाठी, काही अधिनियम आणि आदेशांच्या संबंधित तरतुदी आणि त्यांच्या तारखा निर्दिष्ट करणे आवश्यक आहे. अत्यावश्यक पुरवठा अधिनियम दिनांक १९/११/१९४६ रोजी लागू झाला. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९३५ च्या कलम ९२ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहेः

"............संघराज्य विधिमंडळाचा किंवा प्रांतीय विधिमंडळाचा कोणताही अधिनियम जोपर्यंत गव्हर्नर सार्वजनिक अधिसूचनेद्वारे तसे निर्देश देत नाही तोपर्यंत वगळलेल्या क्षेत्राला किंवा अंशतः वगळलेल्या क्षेत्राला लागू होणार नाही आणि राज्यपाल सार्वजनिक अधिसूचनेद्वारे कोणत्याही अधिनियम संदर्भात निदेशित करताना असे निदेश देऊ शकतील की सदर अधिनियम त्या क्षेत्राला लागू होताना ......... त्यांना योग्य वाटेल अश्या अपवाद किंवा बदलांच्या अधीन राहून त्याचा प्रभाव होईल”.

या कलमाने त्यांना बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करतांना, बंगालच्या गव्हर्नरनी दिनांक १४ डिसेंबर १९४६ रोजी जाहीर केलेल्या अधिसूचनेद्वारे निर्देश जारी केले की अत्यावश्यक पुरवठा अधिनियम दार्जिलिंग जिल्हा जो वगळलेला भाग होता त्याला लागू होईल.

अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाच्या कलम १ (३) मध्ये अशी तरतूद आहे की इंडिया

ॲक्ट  (केंद्र सरकार आणि विधिमंडळ) १९४६ (९ आणि १० भौगो, प्रकरण ३९) च्या कलम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कालावधीच्या समाप्तीवर त्याचा प्रभाव राहणार नाही. अधिनियमाच्या कलम ४ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे:

“ उल्लेख केलेला कालावधी.... हा एक वर्षाचा कालावधी आहे जो हा कायदा संमत झाल्यानंतर घोषणा ज्या तारखेपासून सुरु होते त्या तारखेपासून सुरु होणारा कालावधी आहे किंवा गव्हर्नर जनरल यांनी अधिसूचनेनुसार तसे निर्देश दिल्यास त्या तारखेपासून सुरु होणारा दोन वर्षाचा कालावधी :

परंतु, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी उक्त कालावधीच्या विस्तारास मान्यता देणारा ठराव अनेकदा मंजूर केला असल्यास, तो कालावधी, ज्या तारखेस अन्यथा कालबाह्य होईल, अश्या तारखेपासून आणखी बारा महिन्यांसाठी वाढवला जाईल, तथापि ज्या तारखेपासून कोणत्याही परिस्थितीत आणीबाणीची घोषणा बंद होईल त्या तराखेपासून पाच वर्षापेक्षा जास्त काळ चालू राहणार नाही.”

या कलमात संदर्भित असलेली आणीबाणीची घोषणा दिनांक ३१/०३/१९४६ वर प्रवर्तनात असणे बंद झाले. या कलमाच्या दुसऱ्या भागांतर्गत गव्हर्नर-जनरलने अधिसूचना न दिल्याने, अत्यावश्यक पुरवठा कायदा केवळ पहिल्या भागांतर्गत दिनांक ३१/०३/१९४७ पर्यंतच लागू राहिला. तथापि, गव्हर्नर-जनरलने आणीबाणी संपल्याच्या तारखेपासून २ वर्षांच्या कालावधीसाठी सदर अधिनियम कायम ठेवण्याबाबत अधिसूचना जारी केली की सबब अधिसूचनेनुसार, अत्यावश्यक पुरवठा अधिनियम दिनांक ३१/०३/१९४८ पर्यंत अंमलात राहील. दिनांक १८/०७/१९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्य अधिनियम पारित करण्यात आला आणि दिनांक १५/०८/१९४७ रोजी भारत एक अधिराज्य बनला. भारतीय स्वातंत्र्य अधिनियम १९४७ च्या कलम ९ सह कलम १९ (४) अंतर्गत गव्हर्नर-जनरलने दिनांक १४/०८/१९४७ रोजी एक आदेश पारित केला, ज्याने इंडिया ॲक्ट (केंद्र सरकार आणि विधिमंडळ) अधिनियम १९४६ च्या कलम ४ च्या परंतुकात 'संसदेच्या दोन्ही सभागृहांसाठी'

'डोमिनियन लेजिस्लेचर' हे शब्द बदलले आणि संविधान सभेद्वारे डोमिनियन विधिमंडळाच्या अधिकारांचा वापर केला जाईल अशी तरतूद करणाऱ्या नवीन कलम ४ ए चे अनुकूलन करण्यात आले. दिनांक २५/०२/१९४८ रोजी संविधान सभेने आपला पहिला ठराव मंजूर करून अत्यावश्यक पुरवठा कायद्याची अंमलबजावणी एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ३१/०३/१९४९ पर्यंत वाढवली. दिनांक २३/०१/१९४९ रोजी सभेने दुसरा ठराव मंजूर करून त्याद्वारे सदर अधिनियमाचा कार्यकाळ आणखी एक वर्ष म्हणजे दिनांक ३१/०३/१९५० पर्यंत वाढवला.

या कायद्यांच्या आणि अधिसूचनांच्या संदर्भात अपीलकर्त्याच्यावतीने तीन प्रश्न मांडण्यात आले -प्रथमतः, राज्यपालांनी १४ डिसेंबर १९४६ रोजी केलेल्या अधिसूचनेनुसार, दार्जिलिंग जिल्ह्यात अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाची अंमलबजावणी त्या कायद्याची मुदत संपल्यानंतर, म्हणजे आणीबाणी संपल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधी नंतर सुरु होती का; आणि दुसरे म्हणजे, गव्हर्नर-जनरल यांच्या दिनांक ०३/०३/१९४७ च्या अधिसूचनेद्वारे अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाची मुदतवाढ केल्यानंतर सदर अधिनियमाचा कार्यकाळ संपल्यानंतर गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्टच्या कलम ९२ (१) अंतर्गत गव्हर्नर-जनरलनी नव्याने अधिसूचना जारी करणे आवश्यक नव्हते का? आणि तिसरे म्हणजे, संविधान सभेने मंजूर केलेला ठराव अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाची मुदत वाढवू शकते का?

आता हे स्पष्ट झाले आहे की अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाच्या कलम १ (३) अंतर्गत, इंडिया ऍक्ट (केंद्र सरकार आणि विधिमंडळ) १९४६ च्या कलम ४ मध्ये नमूद केलेल्या कालावधीच्या समाप्तीवर त्याचा प्रभाव राहणार नाही. त्या कलमात नमूद केलेला कालावधी आणीबाणीच्या समाप्तीच्या तारखेपासून एक वर्ष असणे आवश्यक नाही. जर गव्हर्नर-जनरलने अधिसूचनेद्वारे तसे निर्देश दिले तर सदर कालावधी २ वर्षे असू शकतो आणि परंतुकानुसार ते प्रत्येकी १ वर्षाच्या हप्त्यांमध्ये जास्तीत जास्त ५ वर्षांच्या कालावधीपर्यंत जाऊ शकतो. त्यामुळे अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाच्या

अंमलबजावणीचा कालावधी निश्चित करणे हे इतर कोणत्याही अधिनियमावर सोडले जात नाही. अधिनियमानेच त्याची तरतूद केली आहे. आधीच सांगितल्याप्रमाणे, राज्यपालांनी जारी केलेल्या १४ डिसेंबर १९४६ च्या अधिसूचनेने दार्जिलिंग जिल्ह्यात अत्यावश्यक पुरवठा अधिनियम लागू केला आणि गव्हर्नर-जनरलच्या अधिसूचनेद्वारे त्याची मर्यादा ३१/०३/१९४८ पर्यंत वाढवण्यात आली. हे समजणे कठीण आहे की दार्जिलिंग जिल्ह्यात या अधिनियमाचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्टच्या कलम ९२ (१) अंतर्गत नव्याने अधिसूचना का आवश्यक आहे. राज्यपालांच्या अधिसूचनेत सदर अधिनियम दार्जिलिंग जिल्ह्यात अंमलात राहण्यासाठी कोणताही विशिष्ट कालावधी निर्दिष्ट न करता तो विस्तारित करण्यात आला आणि त्यामुळे हा अधिनियम उर्वरित भारतात जो पर्यंत अंमलात राहील तोपर्यंत दार्जिलिंग जिल्ह्यात अंमलात असेल. भारतीय स्वातंत्र्याचा अधिनियम लागू होण्यापूर्वी त्याची अंमलबजावणी थांबली असती आणि वगळलेल्या क्षेत्राला लागू करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कायद्याने पुन्हा अधिनियम केला असता तरच गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्टच्या ९२ (१) अंतर्गत गव्हर्नरनी अधिसूचना जारी करणे आवश्यक होते. अन्यथा, नव्याने अधिसूचना जारी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

भारतीय स्वातंत्र्य अधिनियम, १९४७ चे कलम १९(४) मधे खालीलप्रमाणे तरतूद दिली आहे की -

"या अधिनियमात, अन्यथा आवश्यक असेलेल्या संदर्भाशिवाय -

गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९३५ च्या संदर्भात त्या अधिनियमात सुधारणा करणाऱ्या किंवा पूरक असलेल्या कोणत्याही अधिनियमाचे संदर्भ समाविष्ट आहे आणि विशेषतः इंडिया (केंद्र सरकार आणि विधिमंडळ) ऍक्ट, १९४६ च्या संदर्भात ........"

भारतीय स्वातंत्र्य अधिनियमाच्या कलम ९ आणि १९ अंतर्गत गव्हर्नर-जनरल यांनी केलेल्या अनुकूलनामध्ये इंडिया (केंद्र सरकार आणि विधिमंडळ) ऍक्टच्या कलम ४ मधील 'संसदेच्या दोन्ही सभागृहांसाठी' 'संविधान सभा' हे शब्द प्रतियोजित करण्यात आले आणि संविधान सभेने वेगवेगळ्या तारखांच्या दोन ठरावांद्वारे अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाची

कालमर्यादा दिनांक ३१/०३/१९५० पर्यंत वाढवली आहे. गव्हर्नर जनरलच्या आदेशानुसार अनुकूलन लागू होताच, संविधान सभेने इंडिया (केंद्र सरकार आणि विधिमंडळ) ॲक्टच्या कलम ४ अंतर्गत संसदेच्या दोन्ही सभागृहांना प्रदान केलेले अधिकार संपादित केले. अनूकुलांनाची वैधता प्रश्नापलीकडे आहे.

जतिंद्रनाथ गुप्ता - विरुद्ध - बिहार प्रांत आणि इतर [1] हे प्रकरण येथे लागू होत नाही. आता आपल्यासमोर असलेल्या प्रकरणात, विधिमंडळाने स्वतःच्या बुद्धीचा वापरकरून अधिनियमाचा कालावधी निश्चित केला आहे, परंतु विशिष्ट हप्त्यांमध्ये काम करण्यासाठी जास्तीत जास्त कालावधी गाठण्यासाठी यंत्रणा सोडली आहे . येथे प्रत्यायोजनाचा कोणताही प्रश्न उद्भवत नाही आणि कोणत्याही वैधानिक शक्तींच्या प्रत्यायोजनाचा तर मुळीच नाही.

त्यामुळे याचिका निष्फळ ठरते आणि फेटाळण्यात येते.

फौजदारी अपील क्रमांक २५/१९५१.

या प्रकरणात, अपीलकर्ता बिचन चंद मोल्ला यांच्यावर त्यांचे मालक मेसर्स अमरचंद पन्नालाल तर्फे वेस्ट (पश्चिम) बंगाल कॉटन क्लाथ अँड यार्न कंट्रोल ऑर्डर १९४७ च्या खंड ४ (२) अंतर्गत आवश्यक असलेल्या परवान्याशिवाय एका ट्रक मधून डमडम विमानतळावरील विशेष चार्टर्ड विमानात गिरणीनिर्मित कापडाच्या २८ पिशव्या भरण्याचा आरोप ठेवण्यात आला होता. त्याला प्रथमश्रेणी दंडाधिकारी, बॅरकपूर यांनी अत्यावश्यक पुरवठा अधिनियमाच्या कलम ७ (१) सह कलम ८ अंतर्गत दोषी ठरवून ९ महिन्यांच्या सश्रम कारावासाची आणि १,००० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. सत्र न्यायाधीश, २४ परगना यांनी आरोपींनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. उच्च न्यायालयात त्यांनी दाखल केलेल्या पुनरीक्षण याचिकेचेही असेच झाले. या अपीलात विनीत केलेला कायदेशीर युक्तिवाद पूर्वीच्या अपीलाप्रमाणेच होता आणि आधीच नमूद केलेल्या करणमीमांसेप्रमाणे असमर्थनीय म्हणून फेटाळला गेला पाहिजे. मेन्स रियाचा (अपराधी भावनेचा) घटक

1 [१९४९] एफ.सी. आर. ५९६

आवश्यक होता अश्या एका विशेष मुद्द्याचा युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु या प्रश्नाला उच्च न्यायालयाने बाजूला सारले आणि असे म्हंटले की ज्यातून मेन्स रियाचा (अपराधी भावनेचा) अंदाज लावला जाऊ शकतो अशी दोन तथ्ये आहेत. चौकशी केली असता, आरोपींनी सांगितले की तो हातमागाच्या गाठी भरत होता, गिरणीनिर्मित कापड नाही. त्याच्याकडे कोणताही परवाना नव्हता आणि तो त्याच्या मालकाकडूनही काही सादरही करू शकत नव्हता. परिस्थितीनुसार ही तथ्ये गुन्हेगारी हेतूच्या निष्कर्षाची हमी देतात. त्यामुळे

ही अपील देखील खारीज करण्यात येते .

अपीलकर्त्याचा प्रतिनिधीः आर. आर. बिस्वास.

उत्तरवादीसाठी प्रतिनिधीः पी. के. बोस.

हस्तक्षेपकर्त्यासाठी प्रतिनिधीः पी. ए. मेहता.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."